मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात सायबर सिक्युरिटी जनजागृती कार्यक्रम

महासागर प्रतिनिधी

वाडी , दि. १४ :

जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडी येथे आय.क्यू.ए.सी.च्या वतीने सायबर सिक्युरिटी अवेअरनेस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करून त्याचा संदेश समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे आय.क्य.ए.सी. समन्वयक डॉ. नरेंद्र घारड होते. मोबाईलवर येणाऱ्या संशयास्पद संदेश, लिंक व विविध प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीपासून विद्यार्थ्यांनी सावध राहावे आणि इतरांनाही याबाबत जागरूक करावे, असे आवाहन त्यांनी केले.

इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, नागपूर येथील संशोधनपर अभ्यासक विद्यार्थ्यांनी पॉवरपॉइंट सादरीकरण व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून सायबर फसवणुकीचे विविध प्रकार आणि त्यापासून बचाव करण्याच्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच सायबर सरक्षेसाठी उपयुक्त विविध ॲप्सची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा सुरक्षित वापर करून त्याचा शैक्षणिक व सकारात्मक कार्यासाठी उपयोग करण्याची शपथ घेतली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे यांनी युवकांचे भविष्य तंत्रज्ञानाच्या योग्य वापरावर अवलंबून असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी मोबाईलचा उपयोग सकारात्मक कार्यासाठी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन संजना भांडारकर यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

